**प्रेसनोट दि. ०२/११/२०१८**

## दुध व्यवसायीकाचा निघृणपणे खून केलेल्या आरोपींना गुन्हे शाखेकडून १२ तासाच्या आत केली अटक

दि. ०१/११/२०१८ रोजी मयत इसम नामे रोहित अशोक जुनवने, वय २८ वर्षे, रा. औंध, पुणे यांची धारदार हत्याराने सकाळी ०५:३० वा हत्या करण्यात आली होती, व सदरचे हत्या करणारे आरोपी पळून गेले होते. सदर ठिकाणी तात्काळ अती वरीष्ठ अधिकाऱ्यांनी घटनास्थळी भेट देवून सदर गंभीर गुन्हयाच्या तपासाबाबत मा. अपर पोलीस आयुक्त श्री देशपांडे सो. व मा. पोलीस उप आयुक्त, गुन्हे श्री शिरीष सरदेशपांडे सो. तसेच सहा. पोलीस आयुक्त, गुन्हे १, श्री समीर शेख, सहा. पोलीस आयुक्त सो. गुन्हे २, श्री भानुप्रताप बर्गे, यांनी मार्गदर्शक सुचना दिल्या नंतर लागलीच गुन्हे शाखेची वेगवेगळी पथके तयार करून तात्काळ आरोपींचा शोध घेण्याच्या सुचना दिल्या असता गुन्हे शाखा युनिट १ पुणे शहरचे अधिकारी व कर्मचारी यांनी तपास सुरु केला असता, सदरच्या अज्ञात आरोपींबाबत युनिट १ चे पोलीस नाईक सचिन जाधव यांना त्यांचे बातमीदारा मार्फत बातमी मिळाली की, सदर मयत इसमाची हत्या करणारे आरोपी हे हडपसर ग्लायडींग सेंटर येथे लपुन बसले बाबत माहिती मिळाली.

त्यावेळी गुंडा विरोधी पथक पूर्व विभागाचे पो.निरी. बागवान सो. व त्यांचा स्टाफ तसेच युनिट १ कडील पो.उप.निरी. दिनेश पाटील व स्टाफ यांनी आरोपींचा बातमीप्रमाणे सदर ठिकाणी अचानक छापा टाकून गुन्हयातील मुख्य आरोपी नामे १) प्रतिक सुनिल कदम वय १९ वर्षे रा. कस्तुरबा गांधी वसाहत, गणेशखिंड रोड औंध पुणे २) अमोल महादेव चोरामले वय २८ वर्षे रा. सदर ३) आकाश आनंदा केदारी वय २६ वर्षे रा. ३९, औंधरोड, आंबेडकर नगर, चव्हाण वस्ती औंध, पुणे यांना पकडण्यात आले. त्यावेळी त्यांचेकडे सखोल चौकशी करता आरोपी क्र. १ प्रतिक सुनिल कदम याने त्याचेजवळील कोयत्याने त्याचे साथीदारांसह मयत इसमाच्या डोक्यावर व चेहऱ्यावर वार केले होते व कोयते घटनास्थळावर सोडून पळून गेले होते. घटनास्थळावर आरोपी नामे आकाश आनंदा केदारी याची हिरो होंडा मोटार सायकल मिळून आली व त्यावरून आरोपींचा माग काढून नमुद आरोपींना शिताफीने पकडण्यात युनिट १चे टिमला यश आले आहे. सदर बाबत चतु:श्रृंगी पोलीस ठाणे येथे गु.र.नं. ३०२,३०७,१४३, १४७,१४८,१४९,३४ महा. पो. अधि ३७(१),१३५ आर्म ॲक्ट कलम ४(२५) अन्वये गुन्हा दाखल आहे.

सदरची कारवाई ही श्री. प्रदीप देशपांडे सो. अपर पोलीस आयुक्त, गुन्हे, श्री. शिरीष सरदेशपांडे सो. पोलीस उप आयुक्त, गुन्हे. श्री समिर शेख सो. सहा.पोलीस आयुक्त, गुन्हे-१, श्री भानूप्रताप बर्गे, सहा. पोलीस आयुक्त सो. गुन्हे २, यांचे मार्गदर्शनाखाली पो.नि. अंजुमन बागवान, स.पो.निरी. गणेश पवार, पोलीस उप निरीक्षक श्री. दिनेश पाटील, पो.ना. सचिन जाधव, इरफान मोमीन, गजानन सोनुने, अशोक माने, प्रशांत गायकवाड, तुषार माळवदकर, स.पो.फौज. विजेसिंग वसावे, पो.हवा. रिजवान जिनेडी, सुधाकर माने, प्रकाश लोखंडे, सुभाष पिंगळे, श्रीकांत वाघवले, उमेश काटे, इम्रान शेख, तुषार खडके, संजय बरखडे, पो.शि. ताकपेरे, पो.शि. चांदणे यांनी केली आहे.

Scanned by CamScanner